२०) सदर्हु निवासी फ्लॅट शी संबंधीत असलेले जी एस टी टॅक्स व इतर अनुषांगिक कर भरण्याची जबाबदारी लिहून घेणार यांची राहील.

२१) सदर निवासी फ्लॅट चे खरेदीखत तुम्ही निवासी फ्लॅट चे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आमची उर्वरीत रक्कम तुम्ही आम्हास १५ दिवसाचे आंत किंवा त्यापुर्वी देवून माझेकडून खरेदीखत लिहून व नोंदवून घ्यावे, तुम्ही आम्हास आमची उर्वरीत रक्कम दिली नाही व आमचेकडून खरेदीखत लिहून व नोंदवून घेतले नाही तर तुम्ही मला दिलेली इसाराची रक्कम व वेळोवेळी दिलेली रक्कम डुबेल व ती रक्कम तुम्हास परत मागण्याचा हक्क व अधिकार राहणार नाही. आणि आपला सौदा रद्द झाला असे समजून मी सदर निवासी फ्लॅट दुसऱ्यास विकण्यास मोकळा राहील त्याबाबत तुम्हाला कोणताही उजर करता येणार नाही, आणि उलटपक्षी तुम्ही उर्वरीत रक्कम मला दिल्यानंतरही मी खरेदी करुन दिली नाही किंवा टाळाटाळ केली तर खरेदीखत परस्पर कोर्टामार्फत लिहून व नोंदवून घ्यावे. अशा प्रसंगी तुमचे होणारे खर्चास व नुकसानीस आम्ही जबाबदार राहू.

२२) ह्या सौदाचिठ्ठीचा संपुर्ण खर्च तुम्ही म्हणजे लिहून घेणार यांनी केलेला आहे व खरेदीखताचा खर्च देखील लिहून घेणार यांनी करावयाचा आहे असा करार आहे.

२३) उपरोक्त कॉम्प्लेक्स मध्ये म.रा.विज वितरण कं. ने वेगळी नवीन डी.पी. लावावयास सांगितल्यास त्याचा खर्च सर्व दुकानधारक, हॉल मालक, व निवासी गाळेधारक यांनी सामाईकात करावयाचा आहे.

२४) खरेदीखतावर आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन देण्याची जबाबदारी माझी राहील

२५) खरेदीखत तुम्हास बिन बोजाचे व बिना भानगडीचे लिहून व नोंदवून देवू.

ही सौदाचिठ्ठी मी माझे राजीखुशीने लिहून दिली असून ती माझेवर व माझे इस्टेट वारसांवर लागू व बंधनकारक राहील.

ही सौदाचिठ्ठी लिहून दिली, खामगांव, दिनांक -

साक्षीदार — सौदाचिठ्ठी लिहून देणाऱ्याची सही

१. .................................... ..............................................

नंदकिशोर शिवनारायण दुबे

२. .................................... सौदाचिठ्ठी लिहून घेणाऱ्याची सही

..............................................